स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 06–10–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 2. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. प्रमोद भुसारी, अति. उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 191:— नागपूर महानगरपालिकेला बँक ऑफ महाराष्ट्र कडून Line of Credit By way of EOD in Current account of NMC मध्ये रु. 25 कोटी पर्यंत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव स्थायी समिती द्वारा मंजूर करण्याबाबतचा प्रश्न तसेच,

नागपूर महानगरपालिकेला दैनंदिन कराव्या लागणाऱ्या बांधील खर्च व इतर विकासाशी संबंधित खर्चासाठी निधीची कमतरता भासल्यास मनपा निधीचे चालू खात्यामध्ये आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी जास्तीत जास्त रु. 25 कोटी मर्यादेपर्यंत Line of Credit By way of Extraordinary Over Draft ची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत बँक ऑफ महाराष्ट्र, यांनी त्यांचे दि. 7.7.2015 चे पत्रानुसार मंजुरी प्रदान केलेली आहे. महानगरपालिकेला बँक ऑफ महाराष्ट्र कडून सदर सुविधा पुरविण्यासाठी साधारणतः अटी व शर्ती खालील प्रमाणे राहणार आहे.

1 नागपूर महानगरपालिकेला बँक ऑफ महाराष्ट्र कडून वर नमूद EOD ची सुविधा रु. 25 कोटी पर्यंत उपलब्ध राहणार आहे.

2 सदर Line of Credit By way of EOD ही सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महानगरपालिकेला उचल केलेल्या रक्कमेवर बेस रेट 10%P.A.(floating) दराने व्याज + मुद्दल परत करावे लागणार आहे.

3 म.न.पा.कडून सदर प्रकरणी बँक ऑफ महाराष्ट्रला प्रोसेसिंग व इतर फी चे प्रदान करावयाचे नाही.

4 सदर Line of Credit ची सुविधा रु. 25 कोटी ची परतफेड व्याजासह मनपाने बँक ऑफ महाराष्ट्रने मागणी केल्यानुसार करावयाची आहे.

5 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 कलम 109 अंतर्गत तरतूदीनुसार सदर प्रकरण कर्जाच्या स्वरुपाचे व वित्तीय बाबींशी संबंधित असल्यामुळे स्थायी समितीच्या मंजुरीनंतर म.न.पा. महासभेच्या मंजुरीकरिता सादर करण्यात येईल. म.न.पा. महासभेच्या मंजुरीनंतर शासनाचे मंजुरीकरिता सादर करण्यात येईल.

वर नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेला बँक ऑफ महाराष्ट्र कडून Line of Credit By way of EOD in Current account of NMC मध्ये रु. 25 कोटी पर्यंत सुविधा उपलब्ध करुन घेण्याचा प्रस्ताव म.न.पा.महासभेसमोर मंजुरीकरिता सादर करण्यासाठी स्थायी समितीचे मंजुरीस्तव सादर.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्याच्या शिफारसीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 192</u>:— प्रभाग क्र. 17—अ झाडे चौक बस्तरवारी येथे सी.सी. रोडचे काम व प्रभाग क्र. 17—ब मध्ये प्रेमनगर येथे रस्ता डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 29,99,785/—. (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ हजार सातशे पंच्यांशी फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 193</u>:— प्रभाग क्र. 52 अ व ब मध्ये विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 29,99,196/—. (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ हजार एकशे छयांनऊ फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 194</u>:— प्रभाग क्र. 16 अ व ब येथील दत्त मंदीर, लाल नगर, मुदलियार ले—आऊट मध्ये रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव रु. 29,99,694/—. (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ हजार सहाशे चौऱ्यानऊ फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 195</u>:— प्रभाग क्र. 18 अ व ब मध्ये तांडापेठ मुसलमानपुरा व बांग्लादेश नाईकवाडी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करण्याच्या कामास्तव रु. 29,98,627/—. (अक्षरी एकोनतीस लक्ष अठ्ठयांनऊ हजार सहाशे सत्तावीस फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 196:— प्रभाग क्र. 19—अ येथे बांग्लादेश रस्त्याचे डांबरीकरण व प्रभाग क्र. 19—ब येथे नंदगिरी रस्त्याचे सि.सि. पेव्हमेंटचे काम करण्याच्या कामास्तव रु. 29,99,365/—. (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ हजार तीनशे पासष्ठ फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 197:— प्रभाग क्र. 25 येथील धरमपेठ गाडगा व गिरीपेठ, गोरेपेठ येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. 29,99,702/— (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यांनऊ फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 198:— आरोग्य विभागाच्या, हिवताप व हत्तीरोग विभागासाठी ML Oil खरेदीकरिता स्थायी समिती ठराव क्र. 105 दि. 30.06.2015 अन्वये वार्षिक दरकरार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या त्यामध्ये निम्नतम दर मे. रमेश ॲग्रो केस कॉर्पोरेशन भिवंडी यांचे प्रति लिटर रु. 160/— प्रमाणे प्राप्त झाले असून यावर वार्षिक रु. 38,40,000/— खर्च अपेक्षित राहिल. हा खर्च पद क्र. A44201262202 मधून किंवा उपलब्ध प्रावधान मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 199:— प्रभाग क्र. 31—अ मस्कासाथ इतवारी येथे विविध ठिकाणी आर. सी.सी.ड्रेन व आर.सी.सी. भूमिगत पाईप लाईनचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 32,39,730 (अक्षरी बत्तीस लक्ष एकोणचाळीस हजार सातशे तीस फक्त) रक्कमेचा प्राकलनास पद क्र. A42401370826 (614) अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास व या कामाचे न्युनतम दराचे निविदाकार मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 12.25 प्रतिशत कमी दराची रु. 28,42,863/— (अक्षरी अठ्ठावीस लक्ष बेचाळीस हजार आठशे त्रेसष्ठ फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 17 दिनांक 30.03.2015 प्रमाणे उपरोक्त प्रकरणास प्रशासकीय मान्यता स्थायी समिती कडून प्राप्त नव्हती परंतु अनअवधानाने या प्रकरणात निविदा काढण्यात आल्या ही बाब स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात येते अशी सुचना कार्यालयाने केली. ही कार्यालयाची सुचना लक्षात घेता कार्यालयाने प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रशासकीय व निविदेस एकत्रीत मंजूरी, एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते.

भविष्यात प्रशासनाने अशी चुक करू नये व याची दक्षता घ्यावी असे हि स्थायी समिती निर्देश देते यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 200:— शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याकरीता नेमण्यात आलेल्या खाजगीएजन्सीच्या कामावर नियंत्रण व देखरेख करण्याकरीता Project Management consultant (PMC) एजन्सी नियुक्त करण्याकरीता निविदा बोलविण्यात आल्या असता निविदा अटी व शर्ती प्रमाणे Combined Technical व Financial Score महत्तम प्राप्त केलेली M/s Stresalit Kolkata या एजन्सीची रू.48,84,900.00 किंमतीची निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 201:— मनपा हनुमाननगर झोन क्र. 3, करीता ट्रक माऊँटेड सिवर क्लिनींग मशीन सक्शन अधिक जेटींग व्यवस्थेसह खरेदी करण्याकरीता रू. 47.00 लक्ष राशीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करणे व ई निविदा काढण्याचा तसेच प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 202</u>** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर